**MHKO100003242022**

## <u>आदेश निशाणी क्र. १२</u>

वि.प. क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना म्हणणे" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वि.प. क्र. १ ते ४ यांचा अर्ज व अर्जदार यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. वि.प. क्र. १ ते ४ यांचे असे कथन आहे की, वि.प. यांनी कैफीयत देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वि.प. यांना महत्वाची कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झालेने मुदतीत म्हणणे दाखल करता आले नाही. वि.प. क्र. १ ते ४ यांचे म्हणणे दाखल करुन न घेतलेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट वि.प. क्र. १ ते ४ यांचे म्हणणे दाखल न करुन घेतलेस वि.प. क्र. १ ते ४ यांचे नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदार यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वि.प. क्र. १ ते ४ यांना सदर कामाची नोटीस दिनांक ०५/०४/२०२२ रोजी लागू होवून ते दिनांक ११/०४/२०२२ रोजी वकीलामार्फत हजर झाले आहेत. त्यानंतर दिनांक ११/०७/२०२२ रोजी म्हणणे दिले नाही म्हणून "म्हणणे नाही" आदेश झालेला आहे. त्यानंतर अर्जदार यांनी दिनांक ०६/०८/२०२२ रोजी पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जातील कारणे योग्य व संयुक्तीक नाहीत. अर्जदार हे वयोवृध्द असून बेळगांव येथे राहणेस आहेत. सबब सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जदार यांनी सदरचा अर्ज वि.प. क्र. १ ते ४ यांचे विरुध्द दरम्यानचे उत्पन्नाची चौकशी होवून ते ठरवून देणेकरीता दाखल केला आहे. वि.प. क्र. १ ते ४ यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. त्यामुळे वि.प. क्र. १ ते ४ यांचे कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर नाही. अर्जाचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वि.प. क्र. १ ते ४ यांचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत वि.प. क्र. १ ते ४ यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्जाचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वि.प. क्र. १ ते ४ यांनी आपले म्हणणे दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वि.प. क्र. १ ते ४ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

**१)** वि.प. क्र. १ ते ४ यांचा निशाणी क्र. १२ वरील अर्ज,अर्जदार यांना खर्चादाखल रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** वि.प. क्र. १ ते ४ यांनी खर्चाची रक्कम अर्जदार यांना दिल्यानंतर वि.प. क्र. १ ते ४ यांचे प्रस्तुत अर्जासोबत दिलेले म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.01.23 17:11:15 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज**
**दिनांक २३/०१/२०२३**

**(म. ता. खराडे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**गडहिंग्लज**